महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी - बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. १८०० २२ २०१९
Website-https://mahaawaas.com
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./ (PMAYG)/बैठक/२०२३/११३३ दि: २४/०७/२०२३

प्रति,

कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय : मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त..**

दि. १३ जुलै, २०२३ रोजी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांचे अध्यक्षतेखाली उपायुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) व प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांची प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांबाबत आढावा बैठक मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांचे दालन ७ वा मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई येथे दुपारी ०३.०० वा. संपन्न झाली.

सदर बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत सादर करण्यात येत आहे.

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत :**
१. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

**मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीयो कॉन्फरन्सद्वारे आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त**

---

दि. १३ जुलै, २०२३ रोजी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांचे अध्यक्षतेखाली उपायुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) व प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांची प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांबाबत आढावा बैठक मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांचे दालन ७ वा मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई येथे दुपारी ०३.०० वा. संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. राजाराम दिघे | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण ,नवी मुंबई |
| २ | उपायुक्त (विकास) | विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हा परिषद (सर्व) व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित |
| ४ | प्रकल्प संचालक | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित |

मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी बैठकीत उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. सदर बैठकीत प्रधान मंत्री आवास योजना –ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

प्रधानमंत्री आवास योजना –ग्रामीण अंतर्गत आवास प्लस मधील Others Category च्या पात्र कुटूंबांची प्रवर्गनिहाय विगतवारी करण्याबाबत मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना दिल्या. तसेच प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी सर्व ग्रामपंचायतनिहाय यादया प्राप्त करुन घेवून त्यानुषंगाने सदर याद्यांमधून राज्य शासनाच्या निकषानुसार ग्रामसेवक व इतर कर्मचा-यांमार्फत सर्व याद्या मार्क करुन घेण्याबाबत सूचित केले.

राज्यात सद्यस्थितीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ३९,४२९ एवढे लाभार्थी भूमिहिन आहेत. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग यांनी राज्यातील सर्व भूमिहिन लाभार्थ्यांचा विभाग व जिल्हानिहाय आढावा घेतला. ज्या जिल्हयात सर्वात जास्त भूमिहिन लाभार्थी आहेत त्यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देऊन वडिलोपार्जित व नातेवाईकांच्या जागा, जागेसंदर्भात त्यांचेकडून बक्षीसपत्र / संमतीपत्र तयार करुन सदर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

बऱ्याच ठिकाणी वैयक्तिक अतिक्रमण करुन राहणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. गावठाणच्या जागेचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनाच आहेत. त्याप्रमाणे गावठाणचे प्रस्ताव तयार करावेत व ते नियमानुकूल करुन जागा उपलब्ध करुन द्यावी याबाबतच्या सूचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष –ग्रामीण गृहनिर्माण यांनी दिल्या.

त्याचप्रमाणे जिल्हानिहाय आढावा घेतांना जळगाव जिल्हयाने सर्वात जास्त काम केल्याचे दिसून आल्याने मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचारात राज विभाग यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांचे अभिनंदन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांनी सांगितले की, खालील स्तरावर म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती यापैकी कुठल्या स्तरावर काम प्रलंबित आहे त्याचे सर्वेक्षण करुन प्रस्ताव तयार केले व सदर प्रस्ताव संबंधित विभागाला पाठविले व त्याबाबत सतत पाठपुरावा केला, तसेच वडिलोपार्जित जागा असेल तर तसे हमीपत्र / बक्षीसपत्र तयार करुन तेथे बांधकाम सुरु केले, परिणामी जास्तीत जास्त लाभार्थ्यांना जागा उपलब्ध झाली व घरकुले पूर्ण झाली. जळगाव जिल्हयाप्रमाणेच इतर जिल्हयांनी देखील या पध्दतीने कामे करावीत असे मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी सूचित केले. तसेच पुढील बैठकीत सर्व जिल्हयांच्या कामात सुधारणा झाली पाहिजे अशा देखील सूचना देण्यात आल्या. नागपूर जिल्हयाचा आढावा घेत असतांना मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नागपूर यांनी सांगितले की, त्यांच्या जिल्हयातील काही प्रस्ताव शक्ती प्रदत्त समितीकडे सादर केले आहेत. उर्वरित काम पुढील बैठकीपर्यंत पूर्ण करणार असल्याचे सांगितले. कम्युनिटी फॉरेस्ट राईटबाबत मा. प्रधान सचिव यांनी मार्गदर्शन केले. दि. २२ ऑगस्ट २०२२ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे व त्यापध्दतीने कामकाज करण्याबाबत सूचित करण्यात आले.

तसेच प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत पूर्ण घरकुलांचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला. यात नंदूरबार जिल्हयाने एकूण उद्दिष्टांपैकी ८०% काम पूर्ण केले आहे. यामध्ये ८००० घरे ही lintel level ला आहेत. तसेच ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व ग्रामसेवक यांच्यामार्फत जास्तीत जास्त घरकुले पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या सूचनेप्रमाणे दि.१५ ऑगस्ट,२०२३ पर्यंत सर्व जिल्हयांनी अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना सर्व प्रलंबीत हप्ते वितरण करणेबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी सूचित केल्याप्रमाणे लाभार्थ्यांना पहिला, दुसरा हप्ता जर वेळेवर वितरीत केला तर परिणामी जास्तीत जास्त घरकुले पूर्ण होतील, व त्यादृष्टीने आपले काम अधिक गतिमान होईल. ज्या लाभार्थ्यांना पहिला हप्ता दिलेला आहे, परंतु घराचे बांधकाम सुरु केले नाही, अशा लाभार्थ्यांकडून हप्ता वसूल करुन त्यांना रिमांड करणे वा त्यांचे मालमत्तेवर बोजा चढवणे आवश्यक आहे. ज्यांचे हप्ते प्रलंबित आहेत त्यांना तात्काळ हप्ते वितरण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

जी घरकुले प्रलंबित आहेत, ती घरे का प्रलंबित आहेत? ती कुठल्या कारणांमुळे प्रलंबित आहेत? अशा प्रलंबित घरांचे कारणे शोधून सदर कारणांचे निराकरण करुन सदर घरकुले पूर्ण करण्याबाबत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष –ग्रामीण गृहनिर्माण यांनी सूचना दिल्या.

त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत आवास योजना अंतर्गत सर्व जिल्हयांचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला. सध्याच्या १,८७,३३४ घरकुलांना मंजूरी देवून, सदर घरकुले तात्काळ पूर्ण करावेत, तसेच **"मोदी आवास योजना"** या योजनेंतर्गत पुढील तीन वर्षात १० लाख घरे पूण करावयाची आहेत असे देखील मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांनी सांगितले.

**मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी बैठकीत खालीप्रमाणे सूचना दिल्या.**

**१) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आवास प्लस मधील इतर प्रवर्गातील(Other Category) लाभार्थ्यांची इतर मागास प्रवर्ग (OBC), अल्पसंख्यांक (Minority) व खुला (Open) या प्रमाणे विगतवारी करणे.**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आवास प्लस मधील इतर प्रवर्गातील (Other Category) लाभार्थ्यांची इतर मागास प्रवर्ग (OBC), अल्पसंख्यांक (Minority) व खुला (Open) या प्रमाणे विगतवारी करणेबाबत ग्रामविकास व पंचायत राज विभागाने दिनांक ७ जुलै २०२३ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर सुचना दिल्या आहेत. त्यानुसार पुढील बैठकीपर्यंत सदर काम पुर्ण करावयाचे आहे.

**२) राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांमधील उर्वरित लाभार्थ्यांना मंजूरी देणे.**

राज्यामध्ये सद्यस्थितीमध्ये विविध राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांच्या एकूण १,८७,३३४ लाभार्थ्यांच्या मंजूरी देणे प्रलंबित असून पुढील बैठकीपर्यंत सदर मंजूरीची प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी.

**३) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे.**

राज्यामध्ये सद्यस्थितीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणमध्ये एकूण ३९,४२९ उर्वरीत भूमिहीन लाभार्थी असून पुढील बैठकीपर्यंत त्यांना जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही पुर्ण करावी. यामध्ये विगतवारी केल्याप्रमाणे वडीलोपार्जित जागा, नातेवाईकांची जागा, पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजनेतून खरेदी करावयाच्या वैयक्तिक किंवा गटामध्ये जागा, इ. मधून भूमिहीन लाभार्थ्यांना प्राधान्याने जागा देण्याबाबतची कार्यवाही व्हावी.

**४) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजनांमधील अपूर्ण घरकुले पूर्ण करणे.**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील ३,०४,१५८ व राज्य पुरस्कृत आवास योजनांमधील १,६६,६६३ अपूर्ण घरकुले जलदगतीने पुर्ण करण्याचे नियोजन करून दिनांक १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत सदर घरकुले पुर्ण होतील याबाबत दक्षता घ्यावी.

तरी उपरोक्त सूचनांवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे अधिनस्त प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व ग्रामसेवक यांना उद्दिष्ट देवून मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग यांचे सुचनेप्रमाणे दिलेल्या वेळेत कार्यवाही करण्याबाबत सूचित केले.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपस्थित सर्वांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**(डॉ. राजाराम दिघे)**
**संचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष –ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य.**